**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ११ सप्टेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **महाराष्ट्र हे उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम राज्य असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन.**
2. **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त भारतीय जनता पक्ष साजरा करणार 'सेवा पखवाडा'.**
3. **शासनाच्या विविध योजना लोकसहभागातून यशस्वी करण्याचं केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांचं आवाहन.**
4. **मेळघाटातील आदिवासी नागरिकांचं जीवनमान उंचावण्यासाठी जिल्हा परिषदेतर्फे 'विकासयात्रा' उपक्रम.**

फडणवीस

महाराष्ट्र हे देशातील एक उद्योग स्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र हे सर्वोत्तम आहे. तसेच इज ऑफ डुईंग बिसनेस अंतर्गत राज्यात गुंतवणूक आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं . मुंब□त इंडिया ऑस्ट्रेलिया फोरमच्या ग्लोबल लीडर मीट या राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये फडणवीस बोलत होते. गुंतवणूकदार आणि उद्योजकांच्या राज्य शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी येत्या काळात सेवा क्षेत्रासह १४ विविध क्षेत्रांसाठीची धोरण जाहीर होणार आहेत अशी माहिती फडणवीस यांनी दिली. गुंतवणूकदारांच्या सुविधेसाठी मैत्री पोर्टलद्वारा एक खिडकी योजना निर्माण करण्यात आल्याचंही ते म्हणाले. दरम्यान, महाराष्ट्राच्या विविध भागात आणि विशेषतः विदर्भात होत असलेल्या गुंतवणुकीबाबत त्यांनी यावेळी माहिती दिली -

***विदर्भामध्ये काटोलमध्ये रिलायन्स कंझ्युमर प्रोडक्ट्स लिमिटेड, एक फूड पार्क आणि शीतपेय पार्क त्या ठिकाणी तयार करताहेत 1513 कोटींची गुंतवणूक आहे. 500 लोकांना रोजगार आहे आणि मेसर्स अदानी एंटरप्राइजेस लिमिटेड, हे कोल***

***गॅसिफिकेशन आणि डिरव्हेटिव्ह अशा प्रकारची 70 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करताहेत. त्यातनं जवळपास 30 हजार 500 लोकांना रोजगार मिळणार आहे. अशी एकूण महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये 1 लाख 08 हजार ,599 कोटींची गुंतवणूक आणि 47 हजार लोकांना रोजगार याचे करार आज आपण या ठिकाणी केले आहेत.***

'सेवा पखवाडा'

भारतीय जनता पक्ष १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'सेवा पखवाडा' साजरा करणार आहे. या दरम्यान रक्तदान शिबिरं, आरोग्य शिबिरं, स्वच्छता मोहीम, मॅरेथॉनचे आयोजन केले जाईल अशी माहिती भाजप मुख्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी दिली. मोदी यांनी भारतीय राजकारणात सेवा, स्वच्छता यासारखे मूलभूत विषय स्थापित केले आहेत आणि संपूर्ण देशाला स्वच्छतेचा महामंत्र दिला आहे असे ते म्हणाले. या कालावधीत देशभरात पंतप्रधान मोदींच्या कार्यांवर प्रदर्शने आयोजित केली जातील आणि विविध जिल्ह्यांमध्ये बुद्धिजीवींचे चर्चासत्र आयोजित केले जाणार आहे. २१ सप्टेंबर रोजी सकाळी देशभरातील ७५ शहरांमध्ये एकाच वेळी मोदी विकास मॅरेथॉनचे आयोजन केले जाईल. यासोबतच २१ ते २५ सप्टेंबर दरम्यान देशभरात खासदारांचा क्रीडा पंधरवडा आयोजित केला जाणार आहे, अशी माहिती यादव यांनी दिली.

अजित पवार(सारथी)

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील सुरक्षित बेरोजगार तरुणांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यासाठी वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, गट प्रकल्प कर्ज योजना अशा विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची अंमलबजावणी पारदर्शक आणि परिणामकारक पद्धतीने होऊन अधिकाधिक लाभार्थ्यांना त्याचा फायदा व्हावा, यावर भर देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेच्या (सारथी) कामाचा आढावा त्यांनी घेतला.

धम्मचक्र प्रवर्तन दिन

69व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.अभिजित चौधरी यांनी पोलिस भवन इथं आढावा बैठक घेतली. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात येणाऱ्या लाखो अनुयायांच्या सोयीसाठी सुमारे 950 स्नानगृह आणि शौचालयांची सुविधा सामाजिक न्याय विभागाच्या परिसरात तसेच मध्यवर्ती कारागृहाची भिंत हटवून करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पोलिस आयुक्त, तसच नागपूरचे जिल्हाधिकारी या बैठकीस उपस्थित होते. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात येणाऱ्या अनुयायांना दीक्षाभूमी इथं  जाण्यासाठी दिशा निर्देशक तसेच वाहतुकीच्या व्यवस्थेसाठी  वळण व्यवस्था, वाहन व्यवस्था यासंदर्भात संबंधित यंत्रणांना निर्देश देण्यात आले.  कामठी इथल्या ड्र□ान प□ेस इथं सुद्धा मोठ्या प्रमाणात अनुयायी येतात. त्यांच्यासाठी करावयाच्या सुविधांबाबत देखील या बैठकीत चर्चा करण्यात आली.

जीएसटी प्रतिक्रिया

वस्तू आणि सेवाकर परिषदेनं ५६ व्या बैठकीत वस्तू आणि सेवा कर रचनेच्या सु-सूत्रीकरणाला मान्यता दिली असून यापुढे फक्त ५ आणि १८ टक्के अशी दोन स्तरांत जी.एस.टी.कर आकारणी हो□ल. या सुधारणेचं स्वागत व्यापारी, सामान्य नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर करत आहे. नागपूरच्या किरकोळ  किराणा विक्रेते व्यापारी संघटनेचे अध्यक्ष **प्रभाकर देशमुख** यांनी या संदर्भात प्रतिक्रिया दिली -

***नवीन दरे चालू झाल्यामुळे जी  बचत होणार आहे ती खरेदी मध्ये पुन्हा पुन्हा मार्केट मध्ये  येऊन पुन्हा व्यापार  वाढेल असं मला वाटतं.  तसेच दिवाळी दसरा मध्ये हर्षउल्हासाने खरेदी चालू होईल. कारण ह्या ५% आणि १८% दोनचं प्रकारच्या करप्रणाली ठेवल्या, त्यामुळे या उद्योगामध्ये पूर्णतः लाभांश मिळेल आणि सर्व याबाबतीत खुश असून  मोदीसाहेबाना धन्यवाद देत आहेत.***

मंत्री रक्षा खडसे

केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत आणि नागरिकांच्या सहभागातून यशस्वीपणे  राबविता येतात त्यामुळे लोकसहभागातून गावाचा सर्वांगीण विकास साधता येतो असं  प्रतिपादन केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री  रक्षा खडसे यांनी केलं.  बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर इथं

आज  मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान तालुकास्तरीय कार्यशाळेचं  आयोजन करण्यात आलं  होतं, त्यावेळी त्या बोलत होत्या.

प्रकाश आबिटकर

अकोला जिल्ह्यातील रुग्णालयांसाठी आवश्यक पद मान्यता आणि प्रक्रिया निश्चितपणे पूर्ण  करून आवश्यक सुविधांसाठी निधी कमी पडू देणार नाही.असे प्रतिपादन राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज केलं. त्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी असही ते म्हणाले, जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली त्यावेळी ते बोलत होते.

"विकास यात्रा"

अमरावतीच्या मेळघाटातील आदिवासी नागरिकांचं जीवनमान उंचावणं, रोजगार वृद्धी, पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय आणि सक्षमीकरणासाठी, अमरावती जिल्हा परिषद आणि आयसीआयसीआय बँकेच्या सहकार्यानं "विकास यात्रा" हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. मेळघाटातल्या निवडक गावांमध्ये हा उपक्रम राबवून त्याठिकाणी आर्थिक मदत आणि विविध योजनांद्वारे विकासाला गती देण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. या उपक्रमाचं नुकतचं अमरावती इथं सादरीकरण करण्यात आलं, यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्यासह बँकेचे अधिकारी उपस्थित होते.

विश्वशांती सरोवर

नागपूरच्या वर्धा रोडवरील जामठा इथल्या विश्वशांती सरोवराचा 7 वा वर्धापन दिन उद्या 12 सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता संपन्न होणार असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत हे अध्यक्षस्थानी असतील. या कार्यक्रमासाठी माउंटबू येथून संस्थानाच्या मुख्य प्रशासिका बीके संतोष दीदी आणि अन्य मान्यवर उपस्थिती राहणार आहेत.

हवामान

विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज मुसळधार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. याशिवाय बुलढाणा आणि अकोला जिल्हा वगळता

सर्वत्र वादळी पर्जन्यमान राहणार आहे. आज नागपूर इथं सकाळपासून ढगाळ वातावरण आहे. पावसाच्या सरी अधून मधून हजेरी लावत आहे. दरम्यान उद्या देखील यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली इथं मुसळधार पावसाचा अंदाज असून वर्धा, गोंदिया आणि वाशिम जिल्ह्यात देखील मुसळधार पाऊस पडू शकतो.

बनावट दही

नागपूर शहरात अन्न प्रशासन विभागाने ४ हजार लिटरहून अधिक बनावट दह्याचा साठा जप्त केला आहे. गुप्त माहितीच्या आधारे केलेल्या या कारवा□त मध्य प्रदेशातील जबलपूर येथून नागपूरला बनावट दह्याची तस्करी होत असल्याचं उघड झालं.

***सदरचा ट्रक हा इथे अण्ण व औषध प्रशासनच्या कार्यालयामध्ये आणलेला आहे. दह्याचं सॅम्पल घेण्यात आलेल आहे. त्याच्यानंतर प्रयोगशाळेचा जो काही रिपोर्ट येईल नंतर पुढची कारवाही केली जाईल. त्याच्यावर दंडात्मक होईल कि नाही पुढे ठरेल पण आजच्या घडीला जे हे टिन मध्ये दही आहे ते पूर्ण गंज लागलेले टिन आहेत. त्याचा गंज आहे तो दह्यामध्ये सुद्धा पडत आहे, त्यामुळे ते खराब झालेलं आहे आणि त्याला स्टोरेज कंडिशन नाही आणि त्यांच्याकडे कोणतेही खरेदी बिल, विक्री बिल नाही आणि त्यांच्याकडे कोणताही अन्य पुरावा नाही.***

*****